दि. ०४/०३/२०११

# एन.एफ.टी.ई. (बी.एस.एन.एल.)

## महाराष्ट्र सर्कल, मुंबई

## विनम्र आवाहन

सातारा जिल्ह्यातील एकनिष्ठ सभासद बंधु-भगिनींनो,

दि. २८ फेब्रुवारी २०११ रोजी आपण सर्वांनी एन.एफ.टी.ई. सोडून बी.एस.एन.एल.ई.यु. मध्ये सामिल होण्याचा निर्णय घेतलात. हा निर्णय केवळ चुकीचाच नसून आत्मघातकीसुद्धा आहे.

४ वेळा निवडणूक हरलो म्हणून निराश होऊन आपण कदाचित हा निर्णय घेतला असावा. पण यातून काहीही चांगले साध्य होणार नाही. यावेळी बी.एस.एन.एल.ई.यु.ला ५०% पेक्षाही कमी मते मिळाली असून एन.एफ.टी.ई.ला ३५% मते मिळाली आहेत. दुसरी युनियन म्हणून मान्यता मिळण्यासाठी आपण मा. दूरसंचार मंत्री, मा. चीफ लेबर कमिशनर व मा. सी.एम.डी. यांचेकडे मागणी केलेली आहे. तसेच मद्रास हायकोर्टमध्ये रिट पिटीशनही केलेले आहे. या सर्वांवर लवकरच निर्णय अपेक्षित असून आपणास मान्यता मिळेल ही खात्री आहे. (कारण नेवेली कॉर्पोरेशन या पी.एस.यू. मध्ये न्यायालयीन आदेशानुसार दोन युनियनला मान्यता आहे.) त्यामुळे आपणास मॅनेजमेंट बरोबर मिटींग, नोटीस बोर्ड, ऑफिसमध्ये मिटींग इ. सुविधा निश्चित मिळतील.

एन.एफ.टी.ई. ने केलेले कार्य आपण सर्वजण जाणतात. या ऊलट गेल्या ५ वर्षात सत्ताधारी संघटनेने केलेले कृत्यही आपण जाणतात. ज्यांनी वेज रिव्हिजन, प्रमोशन पॉलिसी, बोनसची वाट लावली, ट्रान्सफरच्या माध्यमातून कामगारांचा छळ केला, आय.पी.ओ./डिसइन्व्हेस्टमेंट व व्ही.आर.एस./सी.आर.एस. ची टांगती तलवार आपल्या डोक्यावर आणली, त्याच युनियनमध्ये जाऊन आपण अशा शक्तींचे हात बळकट करीत आहात की जे हात उद्या आपल्यालाच बी.एस.एन.एल. मधून हद्दपार करतील. त्यांना कंपनीशी वा कामगारांशी घेणे देणे नाही. फक्त सभासद वाढविणे हा एक कलमी कार्यक्रम आहे. त्यांच्या भूलथापांना आपण बळी पडणे हे दुर्दैव आहे.

सर्कल युनियनच्या प्रमुख प्रतिनिधींनी दि. ०३/०३/२०११ रोजी सातारा येथे भेट दिली व सातारा येथील नेते कॉ. विलास माने व अन्य प्रमुख कार्यकर्ते/पदाधिकारी यांचेशी खुली व दीर्घ चर्चा करुन वरील सर्व मुद्दे समजावून दिलेत व निर्णयाचा फेरविचार करावा असे आवाहन केले आहे.

तेव्हा आपणा सर्वांच सद्सद्विवेक बुद्धीला मी नम्र आवाहन करतो की, एन.एफ.टी.ई.चेच सभासद राहून आपण कंपनी व कामगार सुरक्षित ठेवण्याचे महान कार्यात योगदान द्या.

धन्यवाद !

आपला साथी,

**(रमेश आयरे)**
परिमंडळ सचिव, मुंबई